
PRGI : MHMAR/25/A2754

UBHAD•Tirpad,Pune वर्ष - १ * डिसेंबर-२०२५ (त्रैमासिक) अंक १ * मुल्य - ९० रु. * पाने ९९

धारा आदिवासी अभिव्यक्तिची !

उभड



डिसेंबर २०२५ ... १

* संपादक *
संजय बबन घोईरत

अभिप्राय

बाळशास्त्री जांभेकर यांच्या 'दर्पण' पासून सुरू झालेली मराठीतील नियतकालिकांची परंपरा आजही अव्याहत, अखंडपणे महाराष्ट्रात चालू आहे. या परंपरेचाच एक भाग म्हणून मराठीत दलित साहित्य,ग्रामीण साहित्य, कामगार साहित्य, स्त्रीवादी साहित्य, विज्ञान साहित्य,आदिवासी साहित्य, भटक्या विमुक्तांचे साहित्य इत्यादी मधून शोषिताच्या जीवन जाणीवा शब्दाकित होतअसलेले साहित्य,भाषा, कला,संस्कृती, समीक्षा इत्यादींना उजागर करणे,प्रसिद्धी देण्यासाठी विविध स्वरूपाची नियतकालिके मराठीत प्रकाशित केली जातात. याच सांस्कृतिक परंपरेचाच एक भाग म्हणून आदिवासी साहित्य, समाज, कला, संस्कृती, समीक्षा, संशोधन, शिक्षण, कुपोषण, आरक्षण इत्यादी विषयाबद्दल मराठी माणसांच्या वाचनाची भूक भागविण्यासाठी मराठीतील आदिवासी साहित्याला वाहिलेली काही नियतकालिके म्हणजे हाकारा (महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद),फडकी (डॉ.संजय लोहकरे),गोंदण (डॉ. विनोद कुमरे),तारपा (श्री.शंकर बळी), आदिवार्ता(प्रा.दीपक वळवी), आदिवासी महासंघ वार्ता, आदिवासी संशोधन पत्रिका(TRTI), सत्यशोधक जागर इ. नियतकालिके आदिवासी साहित्य,कला, भाषा,समाज, संस्कृती,शिक्षण, समीक्षा,संशोधन आदी विषयावर केंद्रित झालेली आहेत. याच समृद्ध परंपरेचा एक भाग म्हणून पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील तिरपाड या एका छोट्याशा आदिवासी गावातून श्री.संजय बबन घोईरत यांनीधारा आदिवासी अभिव्यक्तीची असे ठळक पूर्ववाक्य असलेले'उभड' हे मासिक संपूर्ण जग कोरोना सारख्या महामारीने ग्रस्त असताना मोठ्या ध्येयनिष्ठेने सुरू करून मराठी वाचक, रसिकांची, वैचारिक,सांस्कृतिक, साहित्यिक,भाषिक भूक भागवून समाजाचे भरण पोषण केले आहे.'उभड' हे मासिक कधी अनियतकालिक तर कधी नियतकालिक स्वरूपात प्रसिद्ध झालेले आहेत. या नियतकालिकात पुणे जिल्ह्यातील आंबेगाव,जुन्नर, खेड,मावळ

इत्यादी तालुक्यातील नवोदित लेखकांना 'उभड' मुळे लेखनाची सुवर्णसंधी मिळाली आहे. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील, अकोले, संगमनेर, राजूर इ. ठिकाणच्या नवोदित कवी, कथाकार, कादंबरीकार, निबंधलेखक, स्पुट लेखक, स्तंभलेखक, विचारवंत, अभ्यासक, समीक्षक, संशोधक, इत्यादींना या अंकातून लिहिण्याची संधी प्राप्त झाली आहे.विशेषतः 'उभड' च्या ऑगस्ट 2021 च्या अंकातून आदिवासी विकास आणि आरक्षण, सह्याद्रीचा परिसर, आदिवासी युवाशक्ती, आदिवासींच्या विविध देव देवता, प्रथा, परंपरा, सण, उत्सव, आदिवासी लोकगीते,पश्चिम महाराष्ट्रातील आदिवासी महादेवकोळी,आदिवासी ठाकर, आदिवासी कातकरी, आदिवासी बोलीभाषा, आदिवासी मुलांचे शिक्षण, आदिवासींमधील नवउद्योजक,आदिवासी क्रांतिकारक इत्यादी अनेक विषयांवर या अंकाचे संपादक श्री.संजय बबन घोईरत,आरती बियाणे,सचिन गिऱ्हे,प्रतिभा चौरे,नागू बोटे,रामदास लोखंडे, सुमन बगाड, एस. जी. पंधेर, संतोष मुठे, माझे विद्यार्थी मित्र डॉ. अमोल वाघमारे,प्रतिक्षा जोशी,नरेंद्र अधापुरे,माझे विद्यार्थी मित्र योगेश डामसे, देवराज जाधव, कवी मित्र तानाजी सावळे, कवी मित्र मोहन नंदकर, रोहित बांगर, श्रावण भवारी इत्यादी कवी, कथाकार निबंधकारांना साहित्य निर्मितीची प्रेरणा, प्रोत्साहन या अंकाद्वारे मिळाले आहे. या सर्वाची सृजनशीलता, निर्मितीशीलता, प्रतिभा घडविण्यात 'उभड' मासिकाच्या संपादकीय मंडळाचे मोलाचे योगदान राहिले आहे. या सर्वाच्या साहित्य निर्मितीला,लेखनाला प्रसिद्धी देण्याचे काम 'उभड' या मासिकाने केलेले आहेत.'उभड' मासिकाच्या संपादक मंडळाला नवनवीन विषयावर विशेषांक काढण्यासाठी आणि आगामी मासिक प्रकाशित करण्यासाठी माझे वतीने हार्दिक शुभेच्छा!

प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर
जेष्ठ साहित्यीक, समीक्षक,
बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव ता. जि. पुणे